● शनिवार, दि. ९ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# प्रतिबंधित गुटख्यावर कारवाई मात्र माफिया मोकाटच

## पोलिसांच्या भूमिकेवर साशंकता; रेकॉर्डवरील गुन्हेगार हद्दपारीच्या कारवाईतून माफीया कसे सुटले?

**दीपक शेळके**

**जालना -** शहरासह जिल्ह्याभरात गुटखा विक्रेत्यांनी आपला जम बसविला असून विविध मार्गाने शहरात गुटखा सर्रास दाखल होत आहे. एकीकडे दिवसाआड पोलीसांच्या कारवायांचा धडाका सुरु असला तरी गुटखा माफिया मात्र मोकाट आहे. पोलीस अधिक्षकांनी केलेल्या एका कारवाईत १३ गुन्हेगारांना नुकतेच जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. असे असले तरी जिल्ह्याभरात विविध पोलीस ठाण्यात सात पेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या गुटखा माफिया व देशी किंग सतिश जैस्वाल याच्यावर मात्र, कोणतीही कारवाई होत नसल्याने पोलीसांच्या कारवायांवर संशय व्यक्त करण्यात येत आहे. जिल्ह्यातील विविध माध्यमांनी या संदर्भात यापुर्वीदेखील वृत्त प्रकाशित केलेले आहे. तरी देखील पोलीस प्रशासन हाताची घडी तोंडावर बोट ठेवून शांत आहे.

जिल्ह्यात विविध गुन्ह्यातील व वारंवार गुन्हे करणाऱ्या तेरा गुन्हेगारांना जालना जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१चे कलम ५५ (१) नुसार विविध पोलीस ठाण्यांकडून पोलीस अधिक्षकांना हद्दपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता त्यानंतर पोलीस अधिक्षकांनी ही कारवाई केली आहे. तसेच जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणेचे अभिलेख पडताळुन आवश्यकते प्रमाणे गुन्हेगारांविरुद्ध अशा स्वरुपाची कारवाई करण्यात येणार असल्याचेही पोलीस अधिक्षकांनी यावेळी कळविले होते.

विविध पोलीस ठाण्यात ३२८ सारख्या सात पेक्षा अधिक गुन्हे असलेल्या सतीश जैस्वाल याच्या संदर्भाने कोणत्याही पोलीस ठाण्याकडून विशेष करुन सदर बाजार पोलीस ठाण्याकडुन हद्दपारीची कारवाई करण्याचा प्रस्ताव यापुर्वी पाठविण्यात आला नसल्याने कारवाई झाली नाही हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे पोलीस ठाण्याकडुन नेमका हद्दीपारीचा प्रस्ताव पाठविल्या जातो की नाही हे लवकरच स्पष्ट होईल.

### साठवणूक केलेल्या गुटखा दुर्लक्षित ?

शहरातील विविध भागात अद्यापही लाखोंचा प्रतिबंधित गुटखा भरवस्तीत मोठ्या प्रमाणावर साठविलेला आहे. या गुटख्याची पोलीसांच्या नाकावर टिच्चून खुलेआमपणे वाहतूक केली जात आहे. या गुटख्याची वाहतूक पोलीसांच्या नजरेतून कशी सुटली यामागे अर्थपुर्ण व्यवहार की आणखी काही असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित होत आहे. दुसरीकडे भरवस्तीत हा गुटखा साठविला जात असून पेट्रोलिंगच्या वेळेस तरी संबंधीत पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकांना हा प्रकार नजरेस येवू नये म्हणजे एकूणच पोलीसांच्या कारभारावर शंका निर्माण करणारा आहे.

## मोदींच्या सभेची जय्यत तयारी; आक्षेपार्ह वस्तू सोबत असल्यास प्रवेश नाही

**अकोला -** पश्चिम विदर्भातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेसाठी सुरक्षेच्या दृष्टीने काही सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये काळे कपडे, वस्तूंसह पिण्याच्या पाण्याची बॉटल आणण्यास देखील मनाई करण्यात आली. आक्षेपार्ह वस्तू सोबत आणल्यास नरेंद्र मोदी यांच्या सभास्थळी प्रवेश नाकारला जाणार असल्याचे सुरक्षा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. सुरक्षेच्या कारणावरून विशेष दक्षता घेतली जात आहे. पश्चिम विदर्भाच्या पाच जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा ९ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात होत आहे. यावेळी पान २ वर

# ३०० कोटींवर डल्ला मारण्याचा प्रयत्न हाणून पाडू - आ. कैलास गोरंट्याल




**जालना । प्रतिनिधी -** समृद्धी महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जालना साखर कारखान्याच्या जमिनीच्या मोबदल्यापोटी मिळणार असलेल्या सुमारे ३०० कोटी रुपयांच्या रकमेवर डल्ला मारण्याचा प्रयत्न अर्जुन खोतकर यांनी चालवला आहे. मात्र, त्यांचा हा प्रयत्न आपण कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ देणार नाही अशी ग्वाही जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंट्याल यांनी दिली.

जालना विधानसभा मतदार संघातील इंदेवाडी, सिंधी काळेगाव, वाघ्रूळ जहागीर आणि रामनगर येथे आयोजित प्रचार सभेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी खा.डॉ.कल्याण काळे, शिवसेनेचे (उबाठा पक्षाचे) जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, विजय चौधरी, मुरलीधर शेजुळ, शिवाजीराव शेजुळ, मुरलीधरराव थिटे, माणिकराव शिंदे, अब्दुल रउफ परसूवाले, राम सावंत, बबनराव खरात, कृष्णा पडूळ,संदीप खरात, डॉ.विशाल धानुरे, सौ. सुषमाताई खरात, गजानन खरात, दत्ता पाटील शिंदे, मनोहर उघडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना गोरंटयाल म्हणाले की, रामनगर आणि परिसरातील शेतकऱ्यांनी जालना सहकारी साखर कारखाना उभा करण्यासाठी आपल्या शेतजमिनी त्यावेळी दिल्या. सहकार महर्षी माजी खासदार बाळासाहेब पवार यांच्या आशीर्वादाने रामनगर येथे कारखाना उभारल्या गेला. या कारखान्याच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असतांनाच या सुरू असलेल्या कारखान्याची पुढे वाट लावण्यात आली. या कारखान्याच्या आणि शेअर्स होल्डर असलेल्या शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन कुणी गिळंकृत केली हे सर्वांना माहीत असल्याचे सांगून गोरंटयाल म्हणाले की, कारखान्याची जमीन गिळंकृत करणाऱ्या खोतकरांचा डोळा आता समृद्धी महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्यापोटी मिळणाऱ्या ३०० कोटी रुपयांवर असल्याचा आरोप त्यांनी केला. जमिनीचा मिळणारा मोबदला खोतकर यांना मिळाला पाहिजे का ? असा प्रश्न उपस्थितांना विचारून हा सर्व मिळणारा पैसा हा कारखान्यासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना, पगार न मिळालेल्या कारखान्याच्या कामगारांना आणि भागधारकांना मिळाला पाहिजे यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगून या प्रकरणी आपण न्यायालयात देखील गेलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी बांधव आणि कामगारांसाठी आपण सतत संघर्षाची भूमिका घेतली आहे. जनतेसाठी काम करावं लागत, तरच लोक निवडून देतात. या निवडणुकीत आपल्याला पुन्हा विधानसभेत पाठवा, उद्या राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार असून सरकार आल्यानंतर आपले प्रमोशन होणार असल्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी त्यांच्या भाषणातून सांगितले असल्याचे नमूद करत आपले प्रमोशन झाल्यानंतर मतदार संघातील जनतेला विकास काय असतो हे दाखवून देईल असा विश्वास गोरंटयाल यांनी शेवटी व्यक्त केला. तत्पूर्वी खा. डॉ. कल्याण काळे, भास्करराव अंबेकर, राजेंद्र राख आदींनी मविआचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांना विजयी करण्याचे आवाहन आपल्या भाषणातून केले. उपरोक्त गावांमध्ये आयोजित प्रचार सभेस दिलीप मोरे, समाधान शेजुळ, संतोष जमधडे, बालाजी शिरसाठ, गणेश ढवळे, सर्जेराव वाघमारे, मच्छिंद्र ढगे, राम कुऱ्हाडे, गणेश खरात, गणेश तिडके, सुरेश कदम, एकनाथ कुटे, सोपान तिरुखे, माऊली इंगळे, नारायण वाढेकर, सुरेश वाढेकर, शामराव लांडगे, मल्हारी पठाडे, राजू वाघ, राम चव्हाण,गोपाल मोरे, राम शेजुळ, युवराज राठोड, विष्णू पडूळ, दामोधर सोनवणे, ज्ञानेश्वर डुकरे, अंजेभाऊ चव्हाण यांच्यासह त्या त्या गावातील हजारो महीला, पुरुष, युवक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## मविआचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ नाना पटोले यांची सभा



**जालना-** जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांची उद्या दि.९ नोव्हेंबर शनिवार रोजी सकाळी जालन्यात जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

शहरातील मुर्गी तलाव परिसरात असलेल्या हॉटेल अमित मध्ये उद्या शनिवारी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख हे राहणार आहेत. यावेळी जालना लोकसभेचे पक्ष निरीक्षक माजी मंत्री डॉ. पी. सी. शर्मा, जालना लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे, मा.आ. वजाहत मिर्झा पान २ वर

युवा आदर्श

### जायबंदी ...

बनू पाहे विश्वज्येता
न् सैन्यात अनागोंदी
एक जागे दो तिकीटे
चाललेली सुंदोपसुंदी
प्रत्येक पक्ष सांगतात
करू सर्वांना आनंदी
होकार सर्व गोष्टींना
डोके डोलवतात नंदी
सामान्य राहे खुरड्या
मंत्र्यांचे वाडे चिरेबंदी
पुढाऱ्यांच्या सभेसाठी
भाड्याची कोंदाकोंदी
थाटात देई आश्वासन
नेत्यांचेताटात बासुंदी
देखणी स्वप्ने भयानक
डोळ्यांत घाले कसंदी
हिटलरशाही रक्तामधे
कुवृत्ती वर्तन खाविंदी
आवाज तर उठे कसा
स्पष्ट बोलायची पाबंदी
फिरू द्या वक्त्यां मुक्त
केवळ नको गाव बंदी
निवडणूकीत हरवूनि
करा अशांस जायबंदी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# आयात केलेले पार्सल छत्रपती संभाजीनगरला पाठवा

## बदनापूर मतदार संघात चर्चेला उधाण; आ. नारायण कुचेंबाबत मतदारांत प्रचंड नाराजी

**जालना । प्रतिनिधी -** २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ऐनवेळी छत्रपती संभाजीनगर येथून आयात केलेला आणि मोदी लाटेत केवळ सतरा दिवसात आमदार झालेल्या व्यक्तीला आता पुन्हा छत्रपती संभाजीनगरला परत पाठविण्याची वेळ आली आहे. केवळ विकासाच्या बाता मारणाऱ्या आणि कोट्यवधींचे आकडे फुगवून सांगत विकासाच्या नावाने ढोंग करणाऱ्या उमेदवाराला स्वगृही पाठविण्याची हीच योग्य वेळ असल्याची चर्चा बदनापूर विधानसभा मतदार संघात सुरु आहे.

कधी काळी शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या बदनापूर विधानसभा मतदार संघ हा २००९ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखील ठेवण्यात आला. त्यातही शिवसेनेच्या संतोष सांबरे यांनी विजयश्री खेचून आणत बालेकिल्ला कायम राखला. मात्र, त्यानंतर २०१४ मध्ये युतीतील बेबनाव आणि जागा वाटपावर असहमती यावर युतीतील शिवसेना आणि भाजपा हे स्वतंत्रपणे लढले. त्यात मोदी लाटेचा प्रभाव वाढून अवघ्या १७ दिवसांमध्ये माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या आशिर्वादाने नारायण कुचे यांना आमदारकीची लॉटरी लागली. ऐरवी आपला संपूर्ण बहुतांश राजकीय काळ हा तत्कालीन औरंगाबाद आणि सध्याच्या छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेत घालवत आपली राजकीय वाटचाल कुचे यांनी केली. विधानसभा निवडणुकीच्यावेळी भाजपाला उमेदवार मिळणे कठीण झाले असतांना रावसाहेब दानवे यांनी आपल्या मर्जीतील नारायण कुचे यांना उमेदवारी दिली आणि तितक्याच ताकदीने निवडून देखील आणले. पण म्हणतात ना सहज मिळालेले यश हे तितकेसे पचनी पडत नाही. त्यानूसार निकालानंतर काही दिवसातच नारायण कुचे यांनी आपल्या शिवराळ भाषेने प्रशासनातील अधिकारी असो वा कर्मचारी किंवा कोणत्या पक्षाचे कार्यकर्ते असतील यांचे खच्चीकरण करण्यास सुरुवात केली. ही बाब न पटल्याने रावसाहेब दानवे यांनी वेळोवळी कुचे यांचे कान उपटले आहेत. यावर हार मानतील ते नारायण कुचे कसले. त्यांनी थेट देवेंद्र फडणवीस आणि इतर वरिष्ट नेत्यांशी संपर्क साधून संधान बांधण्यास सुरुवात केली. येथूनच दानवे आणि कुचे यांच्यात दुरावा निर्माण होण्यास सुरुवात झाली. गेल्या पाच वर्षातील कुचे यांचा कारभार पाहता त्यांनी केवळ प्रत्येक गावात भांडणे लावण्याचे काम केल्याची चर्चा सध्या मतदार संघात जोरात सुरु आहे. केवळ पैशांच्या जोरावर आपण निवडून येवू शकतो अशी मानसिकता असलेल्या अशा उमेदवाराला आपण विधानसभेत बदनापूर मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठवावे का यावर आता मतदार गांभीर्याने विचार करत आहे.



### केवळ गोड बोलून कार्यभाग साधता येणार नाही

२०१९च्या विधानसभा निवडणुकीत नारायण कुचे यांनी किती आश्वासने दिली आणि त्याची किती प्रमाणात पुर्तता केली हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. केवळ एका पक्षाचा आमदार म्हणून त्यांना वरिष्ठांच्या आशिर्वादाने कोट्यवधी रुपयांचा निधी मिळू शकतो परंतू या निधीतून खरेच लोककल्याणकारी प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि चांगल्या दर्जाचे होतात का याचेही त्रयस्थामार्फत परिक्षण होणे तितकेच गरजेचे आहे. कारण गेल्या पाच वर्षांतील इतिहास पाहता केवळ टक्केवारीसाठी कोट्यवधींचा निधी आणला असल्याचे आपण राज्यभरातील अनेक मतदार संघात पाहिले आहे. त्यातून खराच शाश्वत विकास झाला का? याचे परिमार्जन होणे गरजेचे आहे म्हणूनच २०२४ च्या निवडणुकीत आ. नारायण कुचे यांना ही विधानसभा निवडणूक जड जाणार असून केवळ गोड बोलून विजयाचा कार्यभाग साधता येणार नाही अशी चर्चा दबक्या आवाजात बदनापूर शहरासह संपूर्ण मतदार संघात सुरु आहे.

## संपादकीय पान

# नेपाळची नवी कुरापत

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही तरी कुरापती काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने १०० रुपयांची नोट पुन्हा डिझाईन करण्याचा निर्णय घेतला आहे. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले. अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र ज्यावेळी ही नोट छापून चलनात आली त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताच्या सातत्याने कुरापती काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही.

**काय आहे सीमा वाद ?** १८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## मोदींच्या सभेची ...

महायुतीतील घटक पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांसह पाचही जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार उपस्थित राहणार आहेत. या सभेची जय्यत तयारी गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. कृषी विद्यापीठ परिसरात भव्य मंडप उभारला असून सभेसाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या सभेसाठी पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यांमधून लाखो नागरिक येणार असल्याचा दावा भाजपच्यावतीने करण्यात आला. दरम्यान, नरेंद्र मोदी यांच्या सभेच्या पूर्वसंध्येला सभास्थळी उपस्थित राहण्यासंदर्भात काही सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचना केंद्रीय सुरक्षा विभागाने दिल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. सभास्थळी उपस्थित राहण्यासाठी कोणीही काळ्या रंगाच्या वस्तू (शर्ट, रुमाल, ओढणी, स्कार्फ) सोबत ठेवू नये, लोखंडी अवजारे सोबत बाळगू नये, पिण्याच्या पाण्याच्या बॉटल सोबत आणू नये, कोणतीही अशी वस्तू जी आक्षपार्ह असेल ती आणू नये आदी सूचना दिल्या आहेत. अशा कुठल्याही वस्तू सोबत असल्यास सभास्थळी प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## माविआचे उमेदवार ...

यांची विशेष उपस्थिती राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून जालना जिल्ह्याचे पक्ष निरीक्षक मा.आ.नामदेवराव पवार, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, रिपाई गवई गटाचे जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोरकर यांच्यासह इंडिया महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख नेते, विविध आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे. जनतेने उपस्थित राहावे असे आवाहन प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# विभागीय कॅरम स्पर्धेत, जे बी के विद्यालयाच्या विद्यार्थिनी अनुष्का कामे यांची राज्यस्तरावर निवड

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत शिक्षण संस्थेच्या द्वारा संचलित श्रीमती जेबीके विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाच्या २००४ च्या दहावीच्या बॅचचे नुकतेच पार पडले. या स्नेहसंमेलनास अनेक विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये आपण वर्गात कसे होतो वर्गात कशा पद्धतीने खोड्या करायचो, कोण कसे शिकवत होते, त्याचबरोबर शालेय परिसरामध्ये कोणकोणत्या गोष्टी घडायच्या यावर चर्चा केली. शालेय जीवन कशा पद्धतीने उत्कृष्ट होतं हे सांगण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला. त्यानंतर आपण या शाळेच्या ऋणी मध्ये राहायचं ठरव ठरवून या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले की आम्ही आज जे यशस्वी आहोत ते या शाळेमुळे, तसेच अनेक विद्यार्थ्यांनी नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे कौतुक केले. त्याने कॉलेजच्या वर्गांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा तसेच अनेक घटकांचा आणि संस्कारांचे धडे आम्हाला मिळाले असून आम्ही जीवनामध्ये याचमुळे यशस्वी आहोत. अनेक विद्यार्थी शेतकरी आहेत, अनेक विद्यार्थी यशस्वी तिला शिखरावर असून अनेकांनी शेतीसाठी लागणाऱ्या धान्य बियाण्यांच्या कंपन्या काढलेल्या आहेत, अनेक विद्यार्थी संरक्षण सेवेमध्ये आहेत कृषी क्षेत्रामध्ये आहेत. आनंदी वातावरणात पार पडलेल्या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी नको भारत कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार काळे होते, कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून. नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा माजी अधीक्षक सांगोळे सर, नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, माजी उपप्राचार्य मधुकरराव झटे, गणेश राव सावसाक्के, बुकदाणे सर, ससाने सर, राजेश शेवाळे सर, अजहर मामा आदींची मंचावर उपस्थिती होती. याप्रसंगी प्राध्यापक दत्ता देशमुख, राजेश शेवाळे संवसाक्के सर, प्राध्यापक मधुकर झटे, प्राध्यापक भीवसन ससाने, तसेच अध्यक्ष स्थानावरून नंदकुमार काळे यांची भाषणे झाली. या सर्वांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यामध्ये कसं जगायचं याच्याबद्दलच्या शुभेच्छा दिल्या. तुम्ही आपल्या मुलांना कशा पद्धतीने पुढे जाण्यास आपण काळजी घ्यायची आणि आपली मुलं कसे पुढे जातील आणि यशस्वी शिखरावर येतील साठीचा मंत्र प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी विद्यार्थ्यांना सांगितला.




या कार्यक्रमाचे आयोजक वजन या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केलं त्या सर्व मनीष कुलथे, भुजाडे, प्रदीप माघाडे, तसेच ज्या मुलींनी या कार्यक्रमाचे नियोजन केलं त्यामध्ये अनुराधा पंडित, कुलकर्णी, कांबेकर, जमधडे, आदींचा या मंचावर गुरुजनांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या आनंदोत्सव आणि स्नेहमिलनामध्ये सर्व मुलांनी सहभाग घेतला. त्यामध्ये त्यांनी याच वेळेस हा कार्यक्रम घेण्याचे का ठरवले ते सांगितले विकास बोरकर यांनी. सर्व मुले देव दिवाळीला टेंभुर्णी नगर आणि आसपास गावाकडे येत असतात आणि त्यांच्या हा समूह एकत्रित येईल या भावनेतून हा कार्यक्रम दिवाळीच्या त्यामध्ये ठेवण्यात आलेला होता. या कार्यक्रमास वैशाली जमदाडे अनुराधा पंडित, सुनीता मुळे, नीताश्री तांबेकर, सविता उखर्डे ज्योती जाधव,तृप्ती कासारे रेखा आवटी, वनिता शिराळे अरुणा घोडके, उज्वला इंगळे जयश्री खाडे, कांचन मुळे कांचन सवडे, राजकोट राऊत, वैशाली उखर्डे, स्वाती सपकाळ ज्योती डोमळे, कीर्ती देशमुख, दिपाली उखर्डे,प्रकाश साबळे, शरद माघाडे, भिकाजी झोरे देविदास कुमकर, गौतम गायकवाड, दीपक माघाडे जुनेद चाऊस, संतोष डोमळे,संतोष गोरे दत्ता बंगाळे गणेश चव्हाण, अंकुश गाडेकर अमोल पिंपळे, कामखरात गौतम गायकवाड, रमेश उखर्डे विकास जाधव, अतुल भुजाडे निवृत्ती जाधव, मनीष कुलथे,संजय चव्हाण रामदास जोशी, कृष्णा खांडेभराड गंगाधर जाधव, सचिन पेंढारे कैलास ढाले,विलास नार्वेकर, सचिन गायमुखे अनिल यादमाळ,गणेश जाधव किशोर फुले, विलास तांबेकर विजय गोपने, मनोजकणखर, मुरलीधर कुमकर, गजानन लहाने सचिन मुकुटराव, रवींद्र तुपकर, तसेच अनेक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. नंतर सर्व विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होऊन समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी कुलकर्णी अनुराधा पंडित व प्रदीप माघाडे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रदीप माघाडे यांनी केले.

# ज्ञान, शक्ती, भक्ती व ऊर्जेचा महासागर संकटमोचन महाबली हनुमान

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत.हनुमान जयंती दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते.चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोस्तव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जयंती साजरी केल्या जाते.भगवान प्रभु रामचंद्र विष्णुचा अवतार आहे तर हनुमान शंकरजींचा अवतार आहे.मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते.भारतात हनुमान जयंतीला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते.महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुनांचा मोठा भंडार होता.त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी होता परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मर्यादांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली.परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला व हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपले शक्ती प्रदर्शन केले.कारण रामाचे संकट म्हणजे स्वतःचे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते.कारण राम,लक्षण,सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते.तीच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते.मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या मैदानामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते.कारण गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वतः वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुखशांती निमर्ण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते.श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले.कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव आदराने घेतले जाते. याप्रमाणे सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो. सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी वानरसेनेणे आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दील्या.यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या. त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवीले.अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतीत्थाने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला. परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली.सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम-सीता नाही त्याचा मला काय उपयोग?मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या ह्रदयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले. हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार?यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या,जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले! तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते,रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते.हनुमान जयंतीला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील कमी होत असलेल्या प्राणवायूची मात्रा पुर्ण करण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जयंतीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.


कारण करोना काळात प्राणवायूचा पुरवठा न मिळाल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले.यामुळे वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल.सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक्व नाही.महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे.त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल.हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे. असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवीणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ.कारण मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो.आज हनुमान जयंतीचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल.असे जर झाले तर प्रत्येक झाडात,पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल. एक मुखाने बोला जय जय हनुमान

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# महायुतीच्या भ्रष्टाचाराची चाके पंक्चर होणार - उद्धव ठाकरे

**परतूर । प्रतिनिधी -** लोकसभेच्या फटाक्यांनंतर राज्यात विधानसभेनंतरही फटके फुटणार आहेत. महायुतीच्या भ्रष्टाचाराची चाके ही पंक्चर होणार असल्याचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी येथे म्हटले आहे. ते परतूर मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आसाराम बोराडे यांच्या प्रचारार्थ परतूर येथील जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आयोजित सभेत बोलत होते.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करताच लाखोच्या संख्येने एकच घोषणाबाजी करत परतुर शहर दुमदुमले होते. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात म्हणाले औरंगाबाद ला संभाजीनगर हे कोणी केले. तेव्हा आपण इकडे आपल्या जिल्ह्याचे नाव हे छत्रपती संभाजी नगर केलं कोणाला तुम्ही शिकवत आहे कोणाला तुम्ही फसवत आहे छत्रपती संभाजी महाराज चिकलठाणा विमानतळ अजून ते का नाही करत, यापूर्वी किंवा या मधल्या काळामध्ये देशातल्या काही विमानतळा च नाव माझ्यावरती टीका करण्याच्या आधी तुमच्या बुडाखाली काय पेंडिंग आहे ते तर बघा त्यांच्याकडे काय मुद्दे नाहीत मला असं वाटतं लोकसभेतल्या तुम्ही दिलेल्या फटक्यानंतर महाराष्ट्रातील त्याच्यानंतर मोदी आणि शहा भाजपवाल्याला मलम लावायला आलेत तुझ्यावर मग काही तुम्हाला दाखवायची सुद्धा लाज वाटते अशा ठिकाणी तुम्ही वाढवतात यांच्या गाडीला गाडी दिल्ली पर्यंत पुढे जाणार आहे पण मोदीजी तुम्हाला आमच्या महाविकास आघाडीच्या गाडीच्या चाकाची जर एवढी चिंता असेल तर तुमच्या इंजिनाला भ्रष्टाचाराची जी चाके लावले ते पंपचर होनार आहे. ७०,हजार कोटीचा घोटाळा अजित पवारांवर आरोप केला आणि अजित पवार,व सगळे भ्रष्टाचाराची ज्यांच्या वरती आरोप झाले ते सगळे आजूबाजूला घेऊन मोदीजी तुम्ही त्यांच्या प्रचाराला येतात काय कोणत्या तोंडाने जाणार तुम्ही भ्रष्टाचारी म्हटलं त्यांना मत द्या हे कोणत्या तोंडाने तुम्ही महाराष्ट्राला सांगणार आहात. अजित पवारांच्या प्रचाराला जाणार आहेत. हे असं भाजपा चाललेला आहे ज्याला आपण २५-३० वर्ष फसलो आणि ते जे काय म्हणतात आम्ही घरातली चूल पेटवणार आपले हिंदुत्व आहे या देशाला आपला देश कोणता आहे त्याला पण तुम्ही शत्रू बांधणार आहात आमचा हिंदुत्व हे ह्रदयात राम आणि हाताला काम देणार आणि मी तुम्हाला वचन देतो तुमच्या आशीर्वादाने आपले सरकार आले तर अदानीच्या घशात घातलेली मुंबई परत बाहेर काढून मी माझ्या मुंबईतल्या महाराष्ट्र भूमिपुत्रांना तिकडे परवडणारे संपूर्ण महाराष्ट्राला घरे देईल.सारेउद्योग घेऊन गेलात महाराष्ट्र मध्ये येऊ शकणारे उद्योग धंदे हे सुद्धा तुम्ही गुजरातला घेऊन गेलात आणि महाराष्ट्राची किंमत असताना राहिला काय आमचं काय जाते आम्हाला तुमची इच्छा तुम्हाला आम्ही सोबत ठेवलं तर त्याची निवडणूक आज असताना सुद्धा महाराष्ट्रा ची नागपूरला आणत होतो विदर्भात तो मोठा दिवासामध्ये मोदीजींनी गुजरात मध्ये करून दाखवलं महाराष्ट्र खड्ड्यात गेला तरी चालेल. पण मी इकडे माझ्या तिकडचा उद्योग इकडे आणून इथल्या लोकांना रोजगार देणार व तुम्ही काय चूक केली तुम्ही काय केले तर तुम्ही काम नाही करू शकत तुम्ही काय काम करायला गुजरात मध्ये जाणार ही परिस्थिती आज पर्यंत कोणी महाराष्ट्रा वरती आणली मी भाजपला सांगतोय निवडणुकीनंतर ते कुठे दिसणारच नाहीये. आपले सरकार आल्यानंतर पहिल्याप्रथम मी महाराष्ट्राची होणारी आणि महाराष्ट्राचे लुटलेलं वैभव मी परत आणल्याशिवाय राहणार नाही. आणि आपल्या वेळी सरकार चांगलं होतं की नव्हतं चांगलं होतं. आणि तुम्ही शेतकरी किती आला तिकडे त्या वेळी सोयाबीनचा भाव काय होता आता काय आहे कापसाचा भाव कापसाची खरेदी होते मग काय करायचे सरकार चा उपयोग नाही खत घेता कीटकनाशका घेता शेतीचे अवजारे घेता त्याच्यावरती जीएसटी भरता की नाही भरत व जीएसटी चे भाव खालीवर होतात का जास्त दुष्काळ पडला आणि



पान ३ वर

# माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्यावतीने दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** जालना (प्रतिनिधी):- दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे यांच्या वतीने दि.०८ नोव्हेंबर २०२४ रोजी दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून स्नेह मिलन कार्यक्रम ाची सुरुवात करण्यात आली. भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, राजेशजी राऊत, विजयजी कामड, विमलताई आगलावे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी बोलतांना माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, दीपावली स्नेह मिलन हे एकम ेकांना भेटून शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमास आपण उपस्थित राहिलात त्याबद्दल सर्वांचे आभार व प्रकाशाच्या आणि आनंदाच्या सणानिमित्त तुम्हाला आणि तुमच्या परिवाराला हार्दिक शुभेच्छा, तुम्हालाही सुख, समृद्धी, आरोग्य, कीर्ती, आणि आनंद मिळो हीच देवी म हालक्ष्मी चरणी प्रार्थना.

यावेळी पुढे बोलतांना माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, विधानसभेच्या निवडणुका चालू आहेत मी राज्याचा भारतीय जनता पक्षाचा निवडणूक प्रमुख आहे. राज्य सरकारने जनतेच्या कल्याणाचे व हिताचे निर्णय घेतले आहे आणि हेच सरकार पुन्हा राज्यात आलं पाहिजे अशा प्रकारची भावना राज्यातल्या जनतेची झालेली आहे त्यामुळे सूर्यप्रकाशापेक्षा स्वच्छ या राज्यामध्ये पुन्हा भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षाचे सरकार येणारे याची पूर्ण खात्री आहे.

या दीपावली स्नेह मि लन कार्यक्रमास डॉक्टर, वकील, प्राध्यापक, इंजिनियर, उद्योजक, भाजपा जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्यने उपस्थीत होते.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# निवडणूक निरीक्षक वेद पती मिश्र यांनी केली मतदान केंद्राची पाहणी

**जालना -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या पार्श्वभूम ीवर भोकरदन तालुक्यातील ८ मतदान केंद्रास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. मतदान केंद्र रॅम्पची दुरुस्ती, मतदान केंद्र खोलीच्या दरवाज्यांची सुरक्षा, प्रकाशासाठी विजेवरील उपकरणांची व्यवस्था, म तदारांना शुध्द पिण्याचे पाणी व स्वच्छता गृहाची व्यवस्था, मतदारांसाठी मार्गदर्शक फलक लावण्याबाबतच्या सूचना निवडणूक निरीक्षक वेद पती मिश्र यांनी संबंधितांना केल्या.



भोकरदन तालुक्यातील राजुर जिल्हा परिषद प्राथमि क शाळा, भोकरदन जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळा, जयदेववाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वालसावंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारध (बु) जनता हायस्कुल, पिंपळगाव रेणूकाई जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जळगाव सपकाळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आन्वा जिल्हा परिषद प्राथमि क शाळेस प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. यावेळी समन्वय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, गटविकास अधिकारी श्री. सुरडकर, श्री. शहागडकर यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.




**जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकित महविकास आघाडी चे उमेदवारांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तर्फे कैलास गोरंट्याल यांना जाहीर पाठिंबा यावेळी मराठवाडा अध्यक्ष पंडितराव टोमके, मराठवाडा सरचिटणीस विजयकुमार पंडित, जिल्हाध्यक्ष सय्यद फेरोज हादी, महिला जिल्हा उपाध्यक्ष शिलाताई वाहुळ, शहर सचिव सय्यद जफिर, शेख अजिस आदी ( छाया/जावेद तंबोली)**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राजकीय पक्षांनी मतदारांना प्रोत्साहीत करावे - वेद पती मिश्र

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या पार्श्वभूमीवर सर्व उमेदवारांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासन तत्पर असून राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनीही मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे, अशी सूचना निवडणूक निरीक्षक वेद पती मिश्र यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसोबत बैठक घेण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश म हाडिक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांच्यासह नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती.




निवडणूक निरीक्षक श्री. मिश्र म्हणाले की, उमेदवारांनी बँकेत निवडणूकीसाठी उघडलेल्या खात्यातूनच पैशाचा व्यवहार करावा. १० हजार रुपये रक्कमेपेक्षा जास्तीचा व्यवहार धनादेशाद्वारे करण्यात यावा. तसेच खर्चाची दैनंदिन नोंदवही अद्यावत ठेवावी. म तदार यादी जाहिर करण्यात आली असून केवळ निवडणूक ओळखपत्र असेल आणि म तदार यादीत नाव नसेल तर अशा मतदारास मतदान करता येणार नाही. काही अडचण, शंका असल्यास उमेदवारांना सकाळी ९ ते १० या वेळेत शासकीय विश्रामगृहातील हिमालय कक्षात मला प्रत्यक्ष भेटता येईल. असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी दिव्यांग व वयोवृध्द मतदाराचे गृह मतदान, उमेदवारांना ठेवावयाचा दैनंदिन खर्चाचा हिशोब, आचारसंहितेचे पालन, पोस्टल बॅलेट, विधानसभानिहाय लागणारे ईव्हीएम, व्हीव्हीपॅट बॅलेट युनिट, मतदान यंत्राचे रॅण्डम ायझेशन, मतदानादिवशी मतदारांना मतदान केंद्रावर देण्यात येणाऱ्या सुविधा आणि भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानूसार स्ट्राँगरुमची सुरक्षा आदीबाबत सविस्तर माहिती दिली. बैठकीत राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देवून त्यांच्या शंकाचे समाधान करण्यात आले.

## पान १ वरुन

### महायुतीच्या भ्रष्टाचाराची

लोकसभेमध्ये मला शेतकऱ्याने सांगितलं होतं आता हे गणित मला माहित नाही कारण मी शेतकरी नाहीये मला शेतीतलं काही कळत नाहीये पण मला शेतकऱ्याचं हृदय कळतं मला शेतकऱ्याचे अश्रू दिसतात त्याच्यामुळे मी चुकीचं बोललो तर तुम्ही मला माफ करा. प्रधानमंत्री सन्मान योजनेचे किती मिळतात किती कुठे आपल्याला जीएसटी आपल्या मागे लागली म्हणजे केंद्राची माणसं आपल्या सोबत असतात बरे जो काहीतरी शो केला आणि जी काही जाहिरात बाजी केली. महिलांसाठी योजना आणली महिलांना विचारवंतांनी घर चालायला पैसे पोचतात का मी ज्यावेळेला संभाजीनगर मध्ये आलो होतो अंबादास माझ्यासोबत होते शेतकऱ्यांच्या बरोबर बोललो शेतकऱ्यांच्या उपकार नाही केले मी माझं कर्तव्य पार पाडलं पण त्या शेत मधून महिना होत्या तिच्या बाजूला छोट पोर पाचवर्षाचं होते मी विचारले काय ताई पंधराशे रुपये घर चालतंय का त्याला कसं काय म्हणे पोराचा ऍडमिशन नाही घेऊ शकत पंधराशे रुपये येईपर्यंत संपून जातात आणि म्हणून मी ठरवलेला आहे की आपल्या महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर जसं मुलींना शिक्षण मोफत दिले जातात तसे मी माझ्या महाराष्ट्रातल्या मुलाला सुद्धा मोफत शिक्षण दिल्याशिवाय राहणार नाही. घर फोडणारी मंडळी आहेत घरभेदी हे घर मेली तरी चालतील महिलांना तुम्ही पंधराशे रुपये देताय का उपकार करता तुम्ही महिलांची सुरक्षा वाऱ्यावर सोडलेली आहे महिलांवरती रोज अत्याचाराच्या बातम्या येत आहेत. आपल्या देशाचे सामर्थ्य दाखवणं ही गौरवशाली अभिम ानाची गोष्ट छत्रपती शिवाजी महाराज चा आणि एवढं बोगस काम झालं तर पुतळा बनवण्याम ध्ये सुद्धा पैसे खाल्ले आणि आठ महिन्याच्या आत मध्ये आणि माफी कशी मागितली धमकी दिल्यासारखी माफी मागतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा जय शिवाजी जय भवानी तुम्हाला काय वाटलं तुमच्या सगळ्यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितलं निवडणूक आयोगाला की मी शब्द काढणार नाही तुम्हाला तसंच यापुढे म हाराष्ट्र मध्ये जय शिवराय जय शिवराय महाराष्ट्र आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे तुम्ही माझ्या आमदार फोडले तुम्ही माझे खासदार फोडलेत पक्ष चिन्ह वडील सगळं सोडला तरी देखील जनता माझ्यापासून दूर जायला तयार नाहीये हे माझ्या बाळासाहेब मी काय करू मला माझ्या आई-वडिलांचा अभिमान आहे. जय शिवराय जय शिवराय जय हिंद जय महाराष्ट्र. यावेळी सभेसाठी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मिलिंद नार्वेकर, माजी मंत्री आमदार राजेश टोपे, खासदार संजय जाधव, खासदार कल्याणराव काळे, आमदार राजेश राठोड, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेभाऊ देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ निसार देशमुख, जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर, गोपाळराव बोराडे, अनवर देशमुख, अँड पंकज बोराडे, कपिल आकात, भीमराव हतीअंभिरे, बाळासाहेब आकात, माधवराव कदम, बाबासाहेब केळकर, प्रकाश घुले, सुदर्शन सोळंके यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# समोसे सुरक्षारक्षकांनी खाल्ले...

**शिमला । प्रतिनिधी -** हिमाचल प्रदेशमध्ये मुख्यमंत्र्यांसाठी मागवण्यात आलेले समोसे गायब झाल्याच्या प्रकरणावरून राजकारण चांगलंच तापल्याचं दिसतंय. एका कार्यक्रमात मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांच्यासाठी मागवण्यात आलेले समोसे सुरक्षारक्षकांनी खाल्ले. नंतर हे प्रकरण एवढं वाढलं की त्याच्या सीआयडी तपासाचे आदेशही दिल्याची चर्चा आहे. या प्रकरणी गुप्त अहवालही देण्यात आल्याची माहिती समोर येतेय. तर दुसरीकडे विरोधी पक्षांनी काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला केल्याचं दिसतंय. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू हे २१ ऑक्टोबर रोजी सीआयडी मुख्यालयातील एका कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांच्यसाठी लक्कड बाजारातील रेडिसन ब्लू हॉटेलमधून समोसे आणि तीन डबे जेवण ऑर्डर करण्यात आले होते. पण समन्वयाच्या अभावामुळे हे समोसे मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचलेच नाहीत. हे प्रकरण समोर आल्यानंतर त्याची पोलिस उपाधीक्षांकडून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. मुख्यमंत्र्यासाठी ऑर्डर करण्यात आलेले समोसे हे त्या ठिकाणच्या सुरक्षारक्षकांनी चुकून खाल्ल्याचं समोर आले.

# शिवसेनेचे उमेदवार अर्जुन खोतकर यांच्या शहरात कॉर्नर बैठका

**जालना । प्रतिनिधी -** अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहरातील शास्त्री मोहल्ला, शंकरनगर, भवानीनगर, संजयनगर, योगेश्वर कॉलनी येथे भेटी देऊन कॉर्नर बैठकाही घेतल्या. यावेळी रहिवाशांनी त्यांचे फटाक्यांची आतिषबाजीने स्वागत केले. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, शास्त्री मोहल्ल्यातील रस्ता ज्या नगरसेवकाने व त्याचा मालक यांना या निवडणूनीत त्यांची जागा दाखवून देतील. मी आमदार नाही तरीसुध्दा तुमचे कामे केली आहेत. तो स्वत: आमदार, बायको नगराध्यक्ष तरीही टक्केवारी शिवाय कामे करत नाही, टक्केवारीशिवाय त्याला दुसरे काहीही दिसत नाही. गेल्या दहा वर्षापासून त्याची टक्केवारी सुरु आहे. तो आमदार असूनही त्याने शास्त्री मोहल्ल्यातील रोडचे काम केले नाही. आपला अनुदानाचा मुद्दा आहे, तो मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो आहे. काँग्रेसवाले जाती- जातीत भांडणे लावण्याचे काम करत आहे. जात ही आपली मालमत्ता ते समजत आहेत. तो आमदार असूनही कधी तरी आपल्या समस्या जाणून घ्यायला आला का?नगर परिषद त्याच्या ताब्यात आहे. परंतू आता महापालिका, नगर परिषदांच्या निवडणूकाही लवकरच लागणार आहेत. त्यामुळे आपल्याला सजग राहावे लागेल, असेही श्री. खोतकर म्हणाले. यावेळी विष्णू पाचफुले यांच्यासह युवा सेना, महिला आघाडी आणि महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेबीके व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय टेंभूर्णीच्या २००४ च्या बॅचचे स्नेहसंमेलन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील नवभारत शिक्षण संस्थेच्या द्वारा संचलित श्रीमती जेबीके विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाच्या २००४ च्या दहावीच्या बॅचचे नुकतेच पार पडले. या स्नेहसंमेलनास अनेक विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये आपण वर्गात कसे होतो वर्गात कशा पद्धतीने खोड्या करायचो, कोण कसे शिकवत होते, त्याचबरोबर शालेय परिसरामध्ये कोणकोणत्या गोष्टी घडायच्या यावर चर्चा केली. शालेय जीवन कशा पद्धतीने उत्कृष्ट होतं हे सांगण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला. त्यानंतर आपण या शाळेच्या ऋणी मध्ये राहायचं ठरव ठरवून या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले की आम्ही आज जे यशस्वी आहोत ते या शाळेमुळे, तसेच अनेक विद्यार्थ्यांनी नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे कौतुक केले. त्याने कॉलेजच्या वर्गांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा तसेच अनेक घटकांचा आणि संस्कारांचे धडे आम्हाला मिळाले असून आम्ही जीवनामध्ये याचमुळे यशस्वी आहोत. अनेक विद्यार्थी शेतकरी आहेत, अनेक विद्यार्थी यशस्वी तिला शिखरावर असून अनेकांनी शेतीसाठी लागणाऱ्या धान्य बियाण्यांच्या कंपन्या काढलेल्या आहेत, अनेक विद्यार्थी संरक्षण सेवेम ध्ये आहेत कृषी क्षेत्रामध्ये आहेत. आनंदी वातावरणात पार पडलेल्या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी नको भारत कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार काळे होते, कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून. नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा माजी अधीक्षक सांगोळे सर, नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, माजी उपप्राचार्य मधुकरराव झटे, गणेश राव सावसाक्के, बुकदाणे सर, ससाने सर, राजेश शेवाळे सर, अजहर मामा आदींची मंचावर उपस्थिती होती. याप्रसंगी प्राध्यापक दत्ता देशमुख, राजेश शेवाळे संवसाक्के सर, प्राध्यापक मधुकर झटे, प्राध्यापक भीवसन ससाने, तसेच अध्यक्ष स्थानावरून नंदकुमार काळे यांची भाषणे झाली. या सर्वांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यामध्ये कसं जगायचं याच्याबद्दलच्या शुभेच्छा दिल्या. तुम्ही आपल्या म ुलांना कशा पद्धतीने पुढे जाण्यास आपण काळजी घ्यायची आणि आपली मुलं कसे पुढे जातील आणि यशस्वी शिखरावर येतील साठीचा मंत्र प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. या कार्यक्रम ाचे आयोजक वजन या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केलं त्या सर्व म नीष कुलथे, भुजाडे, प्रदीप माघाडे, तसेच ज्या मुलींनी या कार्यक्रमाचे नियोजन केलं त्यामध्ये अनुराधा पंडित, कुलकर्णी, कांबेकर, जमधडे, आदींचा या मंचावर गुरुजनांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या आनंदोत्सव आणि स्नेहमिलनामध्ये सर्व मुलांनी सहभाग घेतला. त्याम ध्ये त्यांनी याच वेळेस हा कार्यक्रम घेण्याचे का ठरवले ते सांगितले विकास बोरकर यांनी. सर्व मुले देव दिवाळीला टेंभुर्णी नगर आणि आसपास गावाकडे येत असतात आणि त्यांच्या हा समूह एकत्रित येईल या भावनेतून हा कार्यक्रम दिवाळीच्या त्यामध्ये ठेवण्यात आलेला होता. या कार्यक्रमास



वैशाली जमदाडे अनुराधा पंडित, सुनीता मुळे, नीताश्री तांबेकर, सविता उखर्डे ज्योती जाधव,तृप्ती कासारे रेखा आवटी, वनिता शिराळे अरुणा घोडके, उज्वला इंगळे जयश्री खाडे, कांचन मुळे कांचन सवडे, राजकोट राऊत, वैशाली उखर्डे, स्वाती सपकाळ ज्योती डोमळे, कीर्ती देशमुख, दिपाली उखर्डे,प्रकाश साबळे, शरद माघाडे, भिकाजी झोरे देविदास कुमकर, गौतम गायकवाड, दीपक माघाडे जुनेद चाऊस, संतोष डोमळे,संतोष गोरे दत्ता बंगाळे गणेश चव्हाण, अंकुश गाडेकर अमोल पिंपळे, काम खरात गौतम गायकवाड, रमेश उखर्डे विकास जाधव, अतुल भुजाडे निवृत्ती जाधव, मनीष कुलथे,संजय चव्हाण रामदास जोशी, कृष्णा खांडेभराड गंगाधर जाधव, सचिन पेंढारे कैलास ढाले,विलास नार्वेकर, सचिन गायम ुखे अनिल यादमाळ,गणेश जाधव किशोर फुले, विलास तांबेकर विजय गोपने, मनोजकणखर, मुरलीधर कुमकर, गजानन लहाने सचिन म ुकुटराव, रवींद्र तुपकर, तसेच अनेक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. नंतर सर्व विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होऊन समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन म ाधुरी कुलकर्णी अनुराधा पंडित व प्रदीप माघाडे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रदीप माघाडे यांनी केले.

# एकीकडे टक्केवारी सम्राट दुसरीकडे कामाचा सपाटा लावणारा - खोतकर



**जालना । प्रतिनिधी** - एकीकडे टक्केवारी सम्राट तर दुसरीकडे कामांचा सपाटा लावणारा, तेही कोणतेही पद नसतांना केवळ काम आणि काम करणारा, असा उमेदवार आपल्याला मिळाला आहे. त्यामुळेच कोणत्याही भुलथापांना बळी न पडता येत्या २० तारखेला धनुष्यबाण या निशाणी समोरील बटन दाबा आणि मला प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी शहर आणि ग्रामीण भागाचा दौर्‍याप्रसंगी केले.

घाणेवाडी, तातेवाडी, पीरपिंपळगांव, तांदुळवाडी, गुंडेवाडी. निधोना यासह जालना शहरातील स्त्री मोहल्ला, शंकरनगर, भवानीनगर, संजयनगर, योगेश्वर कॉलनी येथे भेटी दिल्या.

घाणेवाडी येथे महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांचे फटाके फोडून जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर श्री. खोतकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी गांवकर्यांच्या वतीने श्री. खोतकर यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, मी महायुतीचा उमेदवार आहे. सर्व हेवे-दावे सोडून मला तुमची साथ हवी आहे. आपण पदावर असो वा नसो परंतू तुमच्या गावचा विकास कधीही थांबू दिला नाही. तो अविरतपणे सुरुच ठेवलेला आहे. दुसरे आमदार नुसता पोकळ दावा करतात, मी आणले, मी ते केले, परंतू करीत तर काहीच नाही. उलट शेतकर्यांसाठी नमो योजनेतून बारा हजार रुपये, लाडकी बहिणी योजना अशा किती तरी योजना आणल्या आहेत. उलट विरोधकांचे सरकार राज्यात आले तर या सर्व योजना बंद होतील, असा धोक्याचा इशारा देऊन श्री. खोतकर यांनी येणार्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबून मला प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन गावकर्यांना केले. या कार्यक्रमास गावकर्यांसह युवा सेना, महिला आघाडी, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुंडेवाडी येथेही फटाके फोडून श्री. अर्जुनराव खोतकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी श्री. खोतकर यांनी गांवातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर झालेल्या सभेत बोलतांना श्री. खोतकर यांनी महायुती सरकारने दिलेल्या विविध सवलती व योजनांची माहिति देऊन देऊन ते म्हणाले की, आपण कुठल्याही पदावर नसतांना गुंडेवाडीतील रस्ते आणि पाण्याचा प्रश्न सोडविला आहे. आपण कामांचा धडाका लावल्यामुळे आपली हवा पण चांगली आहे. मी व माझे संपूर्ण कुटूंब तुमच्या सदैव पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही त्यांनी सांगितले.

तांदुळवाडी येथेही फटाके फोडून अर्जुनराव खोतकर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी भुतेकर आणि फिरोजलाला यांचीही समयोचित भाषणे झाली. त्यानंतर श्री. खोतकर म्हणाले की, यावेळी हवा बदलेली आहे. ही हवा आपल्या बाजूने आहे. अत्यंत प्रामाणिकपणे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे सकाळी चार वाजेपर्यंत काम करतात. त्यांना पुन्हा मुख्यमंत्री पदावर पहायचे असेल तर मला आमदार करावे लागेल, असे सांगून ते म्हणाले की, मुख्यमंत्री हे सर्वसामान्यांसाठी काम करणारे मुख्यमंत्री आहेत. शेतकर्यांसाठी सोलार पॅल्ट, कापूस, सोयाबीनला अनुदान, शेतकर्यांना त्यांच्या मालाऐवजी अनुदान हे खात्यात जमा करणारे मुख्यमंत्री आहेत. जालना जिल्ह्यातील १२० गावांसाठी पेयजल योजना राबविल्यामुळे या गावचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे, असे सांगून त्यांनी आपल्याला विजयी करण्याचे आवाहन केले.

पिरपिंपळगांव (नुतनवाडी) येथेही महायुतीचे उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर यांचे फटाके फोडून जंगी स्वागत करण्यात आले. तर गावकर्यांनी श्री. खोतकर यांचा शाल आणि पुष्पहार देऊन सत्कार केला. याप्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, मला मतदान करुन विजयाची गुढी उभारु, पूर्वी दोन हेक्टरला अनुदान मिळत होते, परंतू आपले मुख्यमंत्री आले आणि त्यांनी दोन वरुन तीन हेक्टरसाठी अनुदान देण्यास सुरुवात केली आहे. आपल्या गावातील कोणाचेही आणि कोणतेही काम असून द्यात ते आपण केलेले आहे. तेही टक्केवारीशिवाय! तर दुसरीकडे ते सत्तेवर असूनही टक्केवारी घेतल्याशिवाय काम करत नाहीत, त्यामुळे त्यांना टक्केवारी सम्राट असेच म्हणायला हवे, असेही त्यांनी शेवटी सांगितले.

तातेवाडी येथेही अर्जुनराव खोतकर यांचे फटाके फोडून जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर गांवकर्यांच्यावतीने श्री. खोतकर याचा सत्कार करण्यात आला. तातेवाडी करांनी माझ्यावर प्रारंभापासून भरभरुन प्रेम केले आहे, असेच प्रेम आताही असू द्यात. गावात आपल्या कार्यकाळात सभामंडप आणि स्मशानभूमीचे काम झालेले आहे. यावेळीही मला प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

निधोना येथेही अर्जुनराव खोतकर यांचे फटाके फोडून स्वागत करण्यात आले. त्यांनतर त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व गौतम बुध्दांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यावेळी त्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला श्री. खोतकर यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीस गावकर्यांसह युवा सेना, महिला आघाडी, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.